## नि.दि.मु.क्र. १३७/२०१६ मधील निशाणी ६५ वरील आदेश

सदरहू अर्ज वादींनी महत्वाची कागदपत्रे दाखल करण्याची परवानगी मिळण्याबाबत व सदर दस्तऐवज पुराव्यामध्ये वाचण्याबाबत दाखल केला आहे. सदर अर्जाच्या पुष्टयर्थ वादींनी शपथपत्र दाखल केले आहे. सदर अर्जावर प्रतिवादींनी त्यांचे म्हणणे (नि.६७) दाखल केले.

२. वादीच्या विद्वान विधिज्ञांनी युक्तीवाद केला की, सदरचे दस्तऐवज दावा योग्यतेवर निकाली काढण्याकरीता अत्यंत आवश्यक आहेत. सदर कागदपत्रे दाखल करण्याची परवानगी नाकारल्यास दावा निरर्थक ठरेल. वादीने त्याच्या दाव्यामध्ये व सरतपासाच्या शपथपत्रामध्ये सदर दस्तऐवजाबद्दल कथन केले आहे. दावा वादीच्या पुराव्याकरीता प्रलंबित असून उलटतपास अदयाप चालू झालेला नाही. अर्जातील नमूद कारणांमुळे सदर कागदपत्रे अभिलेखावर या स्थितीला दाखल करण्यास उशीर झालेला आहे. सदर कागदपत्रे अभिलेखावर दाखल करणे अत्यंत आवश्यक आहेत. वादी हे **मीरा विजय मुखेडकर वि. लक्ष्मीनारायण व्यंकोबासा दामम (मयत) वारसांतर्फे (२०१८ (५) एम.एच.एल.जे. ८०९)** या न्यायनिर्णयावर विसंबून आहेत. करीता, त्यांनी अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

३. प्रतिवादींच्या विद्वान विधिज्ञांनी युक्तीवाद केला की, सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम १४ व आदेश १३ नियम १ मधील तरतुदींनुसार दाखल केलेला नाही. सदरचा अर्ज कायदेशीर नाही. अर्जामध्ये विलंबाबाबत कोणतेही संयुक्तीक कारण नमूद केले नाही. दाव्यात मुद्दे काढण्यात आले असून दावा चौकशीला लागलेला आहे. सदर कागदपत्रे हे दावा त्याच्या योग्यतेवर काढण्यासाठी आवश्यक नसून वादीची सदर दस्तऐवजांना अनुसरून कथने नाहीत. वादी हा अचानकपणे सदरचे दस्तऐवज दाखल करण्याची परवानगी मागत आहे. त्यामुळे प्रतिवादीच्या बचावामध्ये बदल होणार आहे. वादीने सरतपासाचे परिच्छेद क्र. ४ मध्ये मृत्यू पत्राबाबत उल्लेख केलेला आहे. तरी देखील त्यांनी या आधी नियमानुसार सदरची कागदपत्रे दाखल केली नाहीत. करीता, त्यांनी अर्ज नामंजूर करण्याची त्यांनी विनंती केली.

४. अर्ज, म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले. उभयपक्षांचा युक्तीवाद ऐकण्यात आला. सदरचा दावा वाटपाकरीता दाखल केलेला आहे. दाव्यामध्ये मुद्दे काढण्यात आले असून दावा वादीच्या पुराव्याकरीता प्रलंबित आहे. वादीने त्यांच्या सरतपासाचे शपथपत्र (नि.६२) दाखल केले असून त्यानुसार पुढील सरतपास व उलटतपास सुरू होणे बाकी आहे. या स्थितीला वादीने सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. दाव्याचे व सरतपसाचे अवलोकन केले असता, त्यामध्ये वादीने मृत्यूपत्राबाबत कथन केलेले

आहे. त्यामुळे सदरचे दस्तऐवज दावा योग्यतेवर निकाली काढण्याकरीता आवश्यक असल्याचे दिसून येते. दावा चौकशीला जरी लागला असला तरी, पुरावे अदयापावेतो सुरू होणे बाकी आहे. त्यामुळे सदरचे दस्तऐवज अभिलेखावर दाखल न केल्यास वादीला गंभीर पूर्वाग्रह (serious prejudice) होत असल्याचे दिसून येते. याउलट, सदर अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादींचे तसे कोणतेही नुकसान होणार असल्याचे दिसून येत नाही.

५. मीरा मुखेडकर (वरीलप्रमाणे) या न्यायनिर्णयामध्ये मा. मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांनी असे निरीक्षण नोंदविले की, मुद्दे काढण्यात आल्यानंतर देखील त्याच्या नंतरच्या स्थितीला दिवाणी न्यायालयास कागदपत्रे दाखल करण्याची परवानगी मंजूर करता येईल जेव्हा तशी वस्तुस्थिती दाखविण्यात येईल. जोपर्यंत विरूध्द पक्षाला गंभीर पूर्वाग्रह होत असल्याचे दिसून येत नाही तोपर्यंत साधारणपणे सदरचा अर्ज नंतरचे स्थितीला देखील विचारात घेता येईल.

६. सबब, उपरोक्त कारणांमुळे व मा. उच्च न्यायालय उपरोक्त न्यायनिर्णयामध्ये निरीक्षणाप्रमाणे, वादीचा सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. परंतू, सदर कागदपत्रे दाखल करण्यास वादीस विलंब झालेला आहे. सदरचा विलंब योग्य तो खर्च लावून मंजूर करणे संयुक्तीक ठरेल. करीता, खालील आदेश पारीत करण्यात आला.

**– : आ दे श :–**

१) प्रस्तुतचा अर्ज (निशाणी ६५) रक्कम रुपये ५००/– चा खर्च प्रतिवादींना देण्याच्या अटीवर तसेच नमूद कागदपत्रे केवळ अभिलेखावर दाखल करण्याच्या हद्दीपुरता मंजूर करण्यात येतो. सदरचा खर्च हा पुढील तारखेपर्यंत देण्याचे आहे.

२) येणेप्रमाणे वादीला सदर दस्तऐवज नियमांप्रमाणे सिध्द करण्याकरीता स्वातंत्र्य देण्यात येत आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by PRASAD SHANKARRAO GIRGAONKAR
Date: 2023.01.25 16:28:57 +0530

पाटण (प्र.शं. गिरगांवकर )

दि. ०७/०१/२०२३. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, पाटण.